# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 26/04/2023 (बुधवार) दुपार

---

### जबर दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०४ किमी अंतरावर मौजा करंभाड येथे दिनांक २५/०४/२०२३ चे ०७/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सौ. सौगीदेवी धतूरी भुईया, वय ६० वर्षे, रा. करंभाड ही घरी सरकारी नळाचे पाणी भरत असता आरोपी नामे– सरिता किशोर भुईया रा. करंभाड फिर्यादीची सून हिने फिर्यादीला म्हटले कि ''तुने पूरा पाणी घर मे भर लिया तेरे वजह से हमे पाणी नही मिला'' असे म्हणून शिवीगाळ करून लाथ मारून खाली पाडले त्यामूळे तिच्या डाव्या हाताच्या खांदयाला मार लागून फँक्चर झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४. भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१४९० रवि बर्वे मो. क्र. ८८३०५६५०७६ हे करीत आहे.

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा वाई येथे दिनांक २५/०४/२०२३ चे ११/०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– १) संगिता ढेरावन २) कलाबाई सोळे ३) बिंदुबाई ढेरावन ४) ईंदल ढेरावन ५) धनराज सोळे ६) दिलावर सोळे ७) कुलगिर ढेरावन सर्व रा. वाई ता. काटोल** यांनी जुन्या वादाचे कारणावरून गावातील गैर कायदयाची मंडळी जमवून फिर्यादी नामे– सौ. बसंतीबाई पंजाबगिर सोलंकी, वय ६५ वर्ष रा. वाई ता. काटोल जि. नागपुर हिला अश्लिल भाषेत शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. नमूद आरोपी यांनी फिर्यादीचे घराचे कवेलूची फोडफाड केली व घरातील कुलरची तोडफोड करून घराचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम २९४, ४४८, ५०६, १४३, ४२७ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. भोजराज तांदूळकर मो. नं ९९२२३ १४४४२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर